रयत शिक्षण संस्थेचे

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर

ता.आंबेगाव जि.पुणे

मराठी विभाग

अहवाल 2024-25

महाविद्यालयातील मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखामंचर-, कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान, मंचर व निसर्ग प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पावसाळ्यानिमित्त **'कृतिशील वसुंधरा काव्यसंमेलन -श्रावणशिरवा'** या काव्यसंमेलनाचे शनिवार दिनांक २४रोजी २०२४/०८/ .करण्यात आले होते आयोजनसदर कार्यक्रमास महाराष्ट्रातील वेगवेगळ्या नाशिक, राजगुरूनगर, पिंपरीचिंचवड-, बारामती, तळेगाव अशा विविध ठिकाणाहून सुमारे जवळपास ४५ कवी सहभागी झाले होते .सर्व कवींनी निसर्ग, पर्यावरण, झाड, पाऊस, श्रावण महिना, पर्यावरण व त्याचे महत्त्व अशा विविध विषयांवरती स्वरचित कविता आपल्या खास अशा शैलीत सादर केल्या या प्रसंगी .मा .दत्ताजी पायमोडे, मा .वैभव टेमकर , मा .संतोष गाढवे यांनी पर्यावरण आणि पर्यावरण जागृती संबंधीचे आपले विचार व्यक्त केले . त्याचबरोबर या काव्यसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपल्या स्वरचित कविता सादर केल्या .काव्यसंमेलनाच्या सुरूवातीस मराठी विभागाच्या विशेष भितीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .या काव्य संमेलनातील कवींच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या सुमारे 120 वृक्षांची लागवड केली.

सांस्कृतिक विभाग व मराठी विभागाने **'पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंती निमित्त १८ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर २०२४ या कलावधीत विविध स्पर्धांचे** आयोजन यशस्वीरीत्या केले. या निमित्ताने महाविद्यालायत प्रश्न मंजूषा, चित्रकला, काव्यलेखन, निबंधलेखन, रांगोळी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यानी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. मराठी विभागाच्या विद्यार्थ्यानी कर्मवीर जयंती निमित्त विशेष भितीपत्रक तयार केले.

प्रथम सत्रातील मराठी विभागाचे सर्व कामकाज पूर्ण झालेले आहे. सर्व विषयांचे अभ्यासक्रम पूर्ण शिकवून झालेले आहेत. अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घेतलेल्या असून गृहपाठ पूर्ण करून घेतले आहेत. सर्व परीक्षांचे पेपर तपासून मार्क्सशिट तयार करून ठेवले आहेत.